Apne liye. Apno ke liye.

**August 05, 2023** **SBIL/CS/NSE-BSE/2324/96**

**Assistant Vice President**
**Listing Department,**
**National Stock Exchange of India Limited,**
**Exchange Plaza,**
**Plot No. C/1, G Block, BKC,**
**Bandra (East), Mumbai 400051**
**NSE Symbol: SBILIFE**

**General Manager**
**Listing Department,**
**BSE Limited,**
**Phiroze Jeejeebhoy Towers,**
**Dalal Street,**
**Mumbai 400001**
**BSE Scrip Code: 540719**

Dear Sir / Madam,

**Subject: Newspaper advertisement - Notice of 23rd Annual General Meeting (AGM)**

Pursuant to Regulation 30 read with Schedule III Part A Para A and 47 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 ("SEBI Listing Regulations"), please find enclosed herewith the copies of newspaper advertisement published in Financial Express and Loksatta on August 05, 2023, regarding the dispatch of the Notice of AGM of the Company through electronic means, e-voting information for 23rd Annual General Meeting of the Company.

The same is hosted on Company's website at www.sbilife.co.in

This is for your information and record.

Thanking You,

Yours faithfully,

Vinod Vijay Koyande

Digitally signed by Vinod Vijay Koyande
DN: c=IN, o=Personal, title=4318,
pseudonym=1332713105988407l9EOhJ
8o9P1xjHS5,
2.5.4.20=b7aebdc9abb6c86a1a59955ee
4cc02387f324e3db28d5f84bd727f0eb6a
a6676, postalCode=400042,
st=Maharashtra,
serialNumber=de78ad2d4c41f28d429c6
8640e9584f845065c355bb616c82d15df
626f7cca8f, cn=Vinod Vijay Koyande
Date: 2023.08.05 13:46:03 +05'30'

**Vinod Koyande**
**Company Secretary**
**ACS No. 33696**

**Encl: A/a**

## संक्षिप्त

### टेनिस : जेसिका पेगुला उपांत्यपूर्व फेरीत

**वॉशिंग्टन :** अमेरिकेच्या जेसिका पेगुलाने सिटी खुल्या टेनिस स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. उपउपांत्यपूर्व सामन्यात पेगुलाने पेटन स्टर्न्सला ६-३, ६-४ पराभूत करत आगेकूच केली. उपांत्यपूर्व फेरीत पेगुलासमोर युक्रेनच्या एलिना स्वितोलिनाचे आव्हान असणार आहे. अन्य सामन्यात, दुसऱ्या मानांकित फ्रान्सच्या कॅरोलिना गार्सियाला युक्रेनच्या मार्टा कोस्त्युककडून २-६, ३-६ असा पराभव पत्करावा लागला. पुरुष एकेरीच्या उपउपांत्यपूर्व सामन्यात फ्रान्सच्या उगो हम्बर्टने जपानच्या योसुके वातानुकीला ६-०, ६-२ असे पराभूत केले.

### क्रिकेट : भारत, वेस्ट इंडिजला दंड

**तारौबा :** भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील तारौबा येथे झालेल्या पहिल्या ट्वेन्टी-२० क्रिकेट सामन्यात षटकांची गती धिमी राखल्याने दोन्ही संघांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. भारताने निर्धारित वेळेत एक षटक कमी टाकले. त्यामुळे भारतीय खेळाडूंना सामन्याच्या मानधनातील पाच टक्के रक्कम दंड म्हणून आकारण्यात आली. तर, विंडीज संघाने दोन षटके कमी टाकल्याने त्यांच्यावर १० टक्के रकमेचा दंड ठोठावण्यात आला.

### फुटबॉल : स्पेनसमोर स्वित्झर्लंडचे आव्हान

**ऑकलंड :** महिला विश्वचषक फुटबॉल स्पर्धेतील बाद फेरीला आज, शनिवारपासून प्रारंभ होणार असून पहिल्या उपउपांत्यपूर्व सामन्यात चांगल्या लयीत असलेल्या स्पेनसमोर स्वित्झर्लंडचे आव्हान असेल. हे दोन्ही संघ विश्वचषक स्पर्धेत प्रथमच एकमेकांविरुद्ध खेळणार आहेत. दुसरा सामना जपान आणि नॉर्वे या संघांमध्ये होणार आहे.
**वेळ :** सकाळी १०.३० वा.
**थेट प्रक्षेपण :** डीडी स्पोर्ट्स, फॅनकोड ॲप

### ॲथलेटिक्स : ज्योती याराजीला कांस्यपदक

**चेंगडू :** तारांकित खेळाडू ज्योती याराजीने शुक्रवारी जागतिक विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत १०० मीटर अडथळा शर्यतीत आपला राष्ट्रीय विक्रम मोडीत काढत कांस्यपदक मिळवले. याराजीने महिलांच्या अंतिम फेरीत १२.७८ सेकंद वेळेसह तिसरे स्थान पटकावले. या कामगिरीने तिने ऑक्टोबर २०२२ मध्ये नोंदवलेल्या १२.८२ सेकंदचा राष्ट्रीय विक्रम मोडीत काढला. पुरुषांच्या २०० मीटर शर्यतीत अमलान बोरगोहेनने २०.५५ सेकंद वेळेसह सत्रातील सर्वोत्तम वेळेची नोंद करताना कांस्यपदक जिंकले.

### ब्रिज : भारताचा उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश

**मुंबई :** भारतीय संघाने युवा जागतिक सांघिक ब्रिज स्पर्धेत १९ साखळी सामन्यांतील दमदार कामगिरीमुळे उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आहे. शुक्रवारी अखेरच्या सामन्यात भारताने सिंगापूरला नमवत २५३ गुणांसह दुसरे स्थान मिळवले. चीन अव्वल स्थानी राहिला. शनिवारी उपांत्यपूर्व फेरी रंगणार आहे. सयंतन कुशारी, साग्निक रोय, प्रीतम दास, सौविक कार, रिक चक्रवर्ती आणि स्वरनाशिश चॅटर्जी यांचा भारतीय संघात समावेश आहे. गेल्या आशियाई स्पर्धेतील सुवर्णपदक विजेते शिबनाथ सरकार हे या संघाचे प्रशिक्षक आणि न खेळणारे कर्णधार आहेत.

### कॅरम : मुंबईच्या दोन्ही संघांचे विजय

**पुणे :** वरिष्ठ राज्य अजिंक्यपद कॅरम स्पर्धेतील सांघिक विभागाच्या सामन्यात मुंबईच्या संघाने दोन्ही गटांत विजयी सुरुवात केली. पुरुष गटात मुंबईने पालघरला ३-० असे नमवले, तर महिला विभागात ठाणे संघावर ३-० अशा फरकानेच मात केली. पुरुष गटाच्या अन्य सामन्यांमध्ये साताराने धुळे संघाला ३-० असे, तर जळगावने कोल्हापूरला २-१ असे पराभूत केले. महिला विभागात सिंधुदुर्गने रत्नागिरीवर २-१ असा आणि पुणे संघाने ठाण्यावर २-१ असा विजय नोंदवला.

# महिला संघाला ऐतिहासिक सुवर्ण

## जागतिक अजिंक्यपद तिरंदाजी स्पर्धेत भारताचे प्रथमच सोनेरी यश

वृत्तसंस्था, बर्लिन


परणीत कौर, ज्योती सुरेखा वेन्नम आणि आदिती स्वामी

**सातार्‍याच्या** १७ वर्षीय आदिती स्वामीने अनुभवी ज्योती सुरेखा वेन्नम आणि परणीत कौर यांच्या साथीने खेळताना 'जागतिक अजिंक्यपद तिरंदाजी स्पर्धेत' भारताला ९२ वर्षांच्या इतिहासात पहिले सुवर्णपदक मिळवून दिले. भारतीय त्रिकुटाने शुक्रवारी कम्पाऊंड प्रकारात महिला सांघिक गटात हे ऐतिहासिक सुवर्णयश संपादन केले.

ज्योती, परणीत आणि आदिती यांनी सर्वोत्तम कामगिरी करताना मेक्सिकोच्या डाफने क्विन्ट्रो, ॲना सोफिया हर्नांडेझ जेऑन, आंद्रेआ बेसेरा संघाचा २३५-२२९ असा पराभव केला. कामगिरीतील सातत्य आणि लक्ष्यभेदामधील अचूकता हे भारतीय संघाच्या कामगिरीचे वैशिष्ट्य ठरले.

''जागतिक स्पर्धेत भारताला प्रथमच सुवर्णपदक मिळवून दिल्याचा आनंद आहे. आम्ही एकाग्रता ठेवली होती. आम्हाला जिंकण्याची खात्री होती,'' अशी प्रतिक्रिया आदितीने व्यक्त केली.

भारतीय संघाचा अंतिम फेरीपर्यंतचा प्रवास विलक्षण होता. पहिल्या फेरीत भारतीय संघाला पुढे चाल मिळाली होती. त्यानंतर उपउपांत्यपूर्व फेरीत तुर्की आणि उपांत्यपूर्व फेरीत चायनीज तैपेइ या संघांवर मात करून त्यांनी आपली आगेकूच कायम राखली. उपांत्य फेरीत गतविजेत्या कोलंबियावर २२०-२१६ असा सनसनाटी विजय मिळवून भारतीय संघाने अंतिम फेरी गाठली.

उपांत्य फेरीतील कोलंबियावरील विजयानेच भारतीय महिला संघाचे वर्चस्व सिद्ध केले होते. अंतिम फेरीत मेक्सिकोविरुद्धही त्यांनी अप्रतिम कामगिरी केली. या विजेतेपदाने जागतिक स्पर्धेतील भारताच्या कामगिरीचा आलेख उंचावला. बर्लिन येथील जागतिक स्पर्धेपर्यंत भारताने ९ रौप्य आणि दोन कांस्य अशी ११ पदके मिळवली होती. यामधील सुवर्णपदकाची उणीव कम्पाऊंड प्रकारात भारतीय महिला संघाने भरून काढली.

ज्योती, परणीत, आदिती आता कम्पाऊंड विभागाच्या वैयक्तिक फेरीतही खेळणार आहेत. एकीकडे रीकर्व्ह प्रकारात भारतीय तिरंदाजांना ऑलिम्पिक पात्रता गाठण्यात अपयश येत असतानाच कम्पाऊंड प्रकारातील सांघिक यशाने भारताला निराशेतून बाहेर काढले.

**७** भारताची तारांकित तिरंदाज ज्योती सुरेखा वेन्नमचे हे जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील एकूण सातवे पदक आहे. तिने यापूर्वी चार रौप्य आणि दोन कांस्यपदके जिंकली आहेत.

### सातार्‍याच्या आदितीची चमक

कम्पाऊंड प्रकाराच्या अंतिम फेरीत मेक्सिकोविरुद्ध भारतीय महिला खेळाडूंनी कमालीच्या एकाग्रतेने आपले लक्ष्य अचूक साधले. अंतिम फेरीत भारताच्या विजयात सातार्‍याच्या आदितचा प्रमुख वाटा होता. आदितीने ८० पैकी सर्वाधिक ७९ गुणांची कमाई केली. त्याच वेळी आंध्र प्रदेशच्या ज्योतीने आणि पंजाबच्या परणीतने प्रत्येकी ७८ गुणांची कमाई केली.

# वैयक्तिक प्रकारातही आदितीच्या सुवर्ण यशाचा विश्वास!

## प्रशिक्षक प्रवीण सावंत यांची प्रतिक्रिया

ज्ञानेश भुरे, लोकसत्ता

**पुणे :** आदिती एकामागून एक पदके मिळवत आहे. प्रशिक्षकाला शिष्याकडून आणखी काय हवे असते. आता वयाच्या १७ व्या वर्षी ती वैयक्तिक प्रकारातही जागतिक सुवर्णपदक मिळवेल असा विश्वास आदितीचे वैयक्तिक प्रशिक्षक प्रवीण सावंत यांनी 'लोकसत्ता'शी बोलताना व्यक्त केला.

गेल्याच महिन्यात आदितीने आयर्लंड येथे युवा जागतिक स्पर्धेत वैयक्तिक सुवर्णपदक पटकावले होते. सातार्‍यातील शेरेवाडी गावातील आदिती अजून कुमार गटात असूनही वरिष्ठ गटातील पहिल्याच स्पर्धेत वैयक्तिक सुवर्णपदक जिंकण्याची तिच्यात क्षमता आहे. आयर्लंडमधील पदकाने आदितीचा आत्मविश्वास उंचावला असून, बर्लिनला जागतिक अजिंक्यपद स्पर्धेसाठी जाताना तिने जिंकूनच येईन असे सांगितल्याचेही प्रवीण म्हणाले.

पोलीस दलात कार्यरत असणाऱ्या प्रवीण सावंत यांच्या मार्गदर्शनाखालील आदिती तिरंदाजी अकादमीत प्रशिक्षण घेते. लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात इयत्ता बारावीत शिकणारी आदिती शांत आणि संयमी आहे. याचमुळे ती कुठल्याही स्पर्धेतील वातावरण आणि परिस्थितीशी सहज जुळवून घेते. एखाद्या स्पर्धेत जिंको किंवा हरो, आदिती त्याचा परिणाम आपल्यावर होऊ देत नाही. दुसऱ्या दिवशी ती लगेच सरावाला हजर असते. मुख्य म्हणजे भ्रमणध्वनी आणि समाजमाध्यमापासून आदितीने स्वतःला दूर ठेवले आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वतःला सिद्ध करण्याचा प्रयत्न करत असताना याची खूप आवश्यकता आहे, असेही प्रवीण यांनी सांगितले.

# भारताचे बरोबरीवर समाधान



**चेन्नई :** तीन वेळचे विजेते आणि संभाव्य विजेतेपदाच्या शर्यतीमध्ये पहिली पसंती असलेल्या यजमान भारताला आशियाई चॅम्पियन्स करंडक हॉकी स्पर्धेत शुक्रवारी जपानविरुद्ध १-१ अशा बरोबरीवर समाधान मानावे लागले.

**चॅम्पियन्स करंडक** हॉकी स्पर्धा

स्पर्धेच्या पहिल्या दिवशी चीनवर ७-२ अशा मोठ्या विजयासह दमदार सुरुवात करणाऱ्या भारतीय संघाला जपानचा बचाव भेदणे अवघड गेले. भारतीय खेळाडूंना जपानविरुद्ध कौशल्य दाखवता आले नाही. सामन्याच्या सुरुवातीच्या काही क्षणांत लागोपाठ मिळवलेले तीन पेनल्टी कॉर्नर सत्कारणी लावण्यात भारतीय खेळाडूंना अपयश आले. या निराशाजनक सुरुवातीनंतर भारतीय खेळाडूंना लय सापडलीच नाही.

आशातच केन नागायोशीने २८व्या मिनिटाला जपानला आघाडीवर नेले. विश्रांतीला जपानने आघाडी कायम राखली होती. भारताने बरोबरीसाठी अथक प्रयत्न केले. भारताला गोलसाठी ४३व्या मिनिटाची वाट बघावी लागली. कर्णधार हरमनप्रीत सिंगने हा गोल केला.

दुसरा विजय मिळवून गुणतक्त्यात आघाडीवर जाण्याची भारताला चांगली संधी होती. ती साधण्यात त्यांना अपयश आले. मलेशियाने मात्र चीनला ५-१ असे पराभूत करून आघाडीचे स्थान कायम राखले. अन्य एका सामन्यात कोरिया आणि पाकिस्तान यांच्यातही १-१ अशी बरोबरी झाली.

# सविताला सुवर्ण

**इस्तंबूल :** भारताचे अन्य कुस्तीगीर जपानी प्रतिस्पर्ध्यांपुढे हार पत्करत असताना सविताने ६१ किलो वजनी गटात जपानच्याच कोनामी ओतोला पराभूत करून जागतिक कॅडेट कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. रचना

**जागतिक कॅडेट** कुस्ती स्पर्धा

(४० किलो), मुस्कान (४६ किलो) आणि सृष्टी (६९ किलो) यांना रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. त्याच वेळी नेहाने ५७ किलो वजनी गटातून कांस्यपदकाची कमाई केली. पुरुषांच्या फ्री-स्टाईल विभागात अंकुशने ५५ किलो वजन गटातून अंतिम फेरी गाठली.

सविताने सुरुवातीपासून आक्रमक खेळ करताना कोनामीला प्रतिकार केला. सविताने झटपट गुण वसूल केले. आघाडी घेतल्यावर सविताने बचाव भक्कम ठेवत ९-६ अशा विजयाबरोबर सुवर्णपदक जिंकले.

# रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुच्या प्रशिक्षकपदी अँडी फ्लॉवर



**बंगळूरु :** 'आयपीएल' संघ रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुने झिम्बाब्वेचे माजी क्रिकेटपटू आणि अनुभवी प्रशिक्षक अँडी फ्लॉवर यांची प्रशिक्षकपदी निवड केली आहे. प्रशिक्षक संजय बांगर आणि क्रिकेट संचालक माईक हेसन यांचा बंगळूरु संघासोबतचा करार सप्टेंबरमध्ये संपुष्टात येणार आहे. त्यांना करारवाढ न देण्याचा बंगळूरुच्या व्यवस्थापनाने निर्णय घेतला आहे.

बंगळूरु संघाचे उपसंचालक राजेश मेनन यांनी लंडन येथे फ्लॉवर यांची भेट घेतली. त्यानंतर त्यांची मुख्य प्रशिक्षकपदी निवड करण्याचा निर्णय घेतला. ''रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु संघाशी जोडले गेल्याचा मला आनंद आहे. माईक हेसन आणि संजय बांगर यांनी बंगळूरु संघाला प्रगतिपथावर आणण्यासाठी खूप मेहनत घेतली आहे. या दोघांबद्दलही मला खूप आदर आहे. आता बंगळूरु संघाला वेगळ्या उंचीवर नेण्याचा माझा प्रयत्न राहील,'' असे फ्लॉवर म्हणाले.

फ्लॉवर यांनी गेल्या दोन 'आयपीएल' हंगामांमध्ये लखनऊ सुपर जायंट्स संघाचे प्रशिक्षकपद भूषवले. त्यापूर्वी त्यांनी १२ वर्षे इंग्लंड संघासोबत काम केले होते. २००७मध्ये सर्वप्रथम त्यांची इंग्लंड संघाच्या साहाय्यक प्रशिक्षकपदी नियुक्ती झाली होती. त्यानंतर दोन वेळा इंग्लंड संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदाची जबाबदारीही त्यांनी पार पाडली. 'आयपीएल'मध्ये फ्लॉवर यांनी पंजाब किंग्ज आणि लखनऊ या संघांना मार्गदर्शन केले आहे.

# प्रणॉय-राजावत आमनेसामने!

## दोन्ही खेळाडूंची उपांत्य फेरीत धडक; श्रीकांतचे आव्हान संपुष्टात

**सिडनी :** भारताचा अनुभवी खेळाडू एच. एस. प्रणॉय आणि उद्योन्मुख खेळाडू प्रियांशू राजावत यांनी परस्परविरोधी विजय नोंदवताना ऑस्ट्रेलियन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेची

**ऑस्ट्रेलियन खुली** बॅडमिंटन स्पर्धा

(सुपर ५०० दर्जा) उपांत्य फेरी गाठली. हे दोन भारतीय खेळाडू उपांत्य सामन्यात एकमेकांविरुद्ध खेळतील. मात्र, किदम्बी श्रीकांतला पराभवाचा सामना करावा लागला.

ऑर्लिन्स मास्टर्स स्पर्धेतील विजेत्या राजावतने धक्कादायक निकाल नोंदवताना अनुभवी श्रीकांतला एकतर्फी झालेल्या उपांत्यपूर्व सामन्यात २१-१३, २१-८ असे पराभूत केले. पहिल्या गेममध्ये राजावतने ११-६ अशी आघाडी घेतली. यानंतर त्याने आपली


प्रियांशू राजावत

हीच लय कायम राखत गेम जिंकत सामन्यात आघाडी घेतली. पहिला गेम गमावल्यानंतर श्रीकांत दडपणाखाली दिसला. दुसऱ्या गेममध्ये राजावतने श्रीकांतवर ११-३ अशी आघाडी मिळवली. श्रीकांतने काही गुणांची कमाई केली, पण राजावतसमोर त्याचा निभाव लागला नाही. राजावतने गेमसह सामना जिंकत उपांत्य फेरीतील आपली जागा निश्चित केली.

प्रणॉयने इंडोनेशियाच्या अँथनी सिनिसुका गिंटिंगविरुद्ध ७३ मिनिटे चाललेल्या सामन्यात १६-२१, २१-१७, २१-१४ असा विजय मिळवला.


### सिंधूची निराशाजनक कामगिरी सुरूच

गेल्या काही स्पर्धांपासून सुरुवातीच्या फेऱ्यांमध्ये गाशा गुंडाळणाऱ्या पी. व्ही. सिंधूची निराशाजनक कामगिरी ऑस्ट्रेलियन स्पर्धेतही सुरु राहिली. जागतिक क्रमवारीत १७व्या स्थानी असलेल्या सिंधूला उपांत्यपूर्व फेरीत १२व्या स्थानी असणाऱ्या बेइवेन झँगकडून ३९ मिनिटे चाललेल्या सामन्यात १२-२१, १७-२१ असे पराभूत व्हावे लागले. यापूर्वी सिंधूने अष्मिता चलिहा व आकर्षि कश्यप यांना नमवले होते. आता सिंधू २१ ते २७ ऑगस्टदरम्यान डेन्मार्कच्या कोपनहेगन येथे होणाऱ्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत सहभाग नोंदवेल.

# गुकेशचे यश भारतासाठी आनंदवार्ता!

## माजी बुद्धिबळपटू आणि प्रशिक्षक रघुनंदन गोखले यांचे मत

अन्वय सावंत, लोकसत्ता


रघुनंदन गोखले

**मुंबई :** भारताचा अव्वल बुद्धिबळपटू बनणे, तेही पाच वेळच्या विश्वविजेत्या विश्वनाथन आनंदला मागे टाकून, हे ग्रँडमास्टर डी. गुकेश याचे यश अत्यंत खास असल्याचे मत माजी बुद्धिबळपटू आणि प्रशिक्षक रघुनंदन गोखले यांनी व्यक्त केले. गेल्या काही वर्षांत भारताच्या युवा बुद्धिबळपटूंच्या कामगिरीचा आलेख चढता राहिलेला आहे. आता १७ वर्षीय गुकेशने सध्याच्या घडीचा भारताचा सर्वात आघाडीचा खेळाडू म्हणून लौकिक मिळवणे, ही भारतीय बुद्धिबळासाठी आनंदाची बाब आहे, असेही गोखले म्हणाले.

गुकेशने बाकू येथे सुरू असलेल्या विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेत सलग दोन विजयांची नोंद केली. या कामगिरीसह त्याने जागतिक बुद्धिबळ संघटना म्हणजेच 'फिडे'च्या 'लाइव्ह रेटिंग'मध्ये (क्रमवारीत) आनंदला मागे टाकले. गुकेश २७५६ एलो गुणांसह नवव्या, तर आनंद २७५४ गुणांसह दहाव्या स्थानावर आहे. क्रमवारीत आनंदला मागे टाकणारा गुकेश हा ३६ वर्षांत पहिला भारतीय बुद्धिबळपटू ठरला आहे. १९८६ सालापासून आनंद भारताचा अव्वल बुद्धिबळपटू होता.

''गुकेश भारतीय आणि जागतिक बुद्धिबळाचा युवा तारा आहे. त्याने करोनाच्या काळात, २० महिन्यांत स्वतःच्या खेळावर खूप मेहनत घेतली. तो आधी भारताच्या अव्वल ५० बुद्धिबळपटूंमध्येही नव्हता. मात्र, त्यानंतर त्याने एकामागून एक विजयांची नोंद करताना भारताच्या अव्वल पाच बुद्धिबळपटूंमध्ये स्थान मिळवले. भारतात आणि चीनमध्ये गुणवान बुद्धिबळपटूंची संख्या मोठी आहे. मात्र, गुकेशने सर्वांत दर्जेदार कामगिरी करताना या वर्षाच्या सुरुवातीला आशियातील सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कार मिळवला. आता त्याने खुद्द आनंदला क्रमवारीत मागे टाकण्याची किमया साधली आहे. गुकेशचे हे यश खूप खास आहे. तो आनंदच्याच अकादमीत शिकत असल्याने शिष्य आता गुरूच्या पुढे गेला असे म्हणायला हरकत नाही,'' अशा शब्दांत गोखले यांनी गुकेशचे कौतुक केले.

''गुकेशच्या खेळात आता खूप सुधारणा झाली आहे. त्याच्याकडून भारताला खूप अपेक्षा आहेत. तो कोणत्याही आव्हानाला घाबरत नाही. तो मॅग्नस कार्लसनला नमवणारा सर्वांत युवा खेळाडू आहे. युवा खेळाडूंमध्ये काही महिन्यांपूर्वी प्रज्ञानंदचे नाव आघाडीवर होते. मात्र, आता गुकेश त्याच्या खूप पुढे निघून गेला आहे. भारताचे युवा बुद्धिबळपटू सातत्याने छाप पाडत आहेत. गुकेश आणि प्रज्ञानंद यांच्यासह निहाल सरीन, अर्जुन एरिगेसी यांचीही कामगिरी प्रभावित करणारी आहे. २०-२१ वर्षे किंवा त्याही खालील वयोगटातील खेळाडूंमध्ये खूप स्पर्धा आहे. भारतासाठी ही नक्कीच आनंदाची बाब आहे,'' असेही गोखले म्हणाले.



> सध्या सुरू असलेल्या विश्वचषकात भारताचे १७ बुद्धिबळपटू (मुले-मुली मिळून) खेळत आहेत. यावरून भारतीय बुद्धिबळाचा चढता आलेख लक्षात येतो. त्यामुळे पुढचा विश्वविजेता कदाचित एखादा भारतीय असेल असेही म्हटले जाते. भविष्यात गुकेशला जगज्जेतेपदाची निश्चितच संधी आहे. मात्र, त्यासाठी त्याने कामगिरीत सातत्य राखणे गरजेचे आहे. - रघुनंदन गोखले



> भारतीय बुद्धिबळपटू २७०० गुणांचा टप्पा पार करत होते, पण बराच काळ त्यांना क्रमवारीत अव्वल १० बुद्धिबळपटूंमध्ये स्थान मिळवणे अवघड जात होते. मात्र, आनंदनंतर गुकेशने ही कामगिरी करून दाखवली आहे. वयाच्या २१-२२ व्या वर्षी क्रमवारीत अव्वल पाचमध्ये पोहोचणारे बुद्धिबळपटू पुढे जाऊन विश्वविजेते होण्याची शक्यता अधिक असते असे इतिहास सांगतो. त्यामुळे १७ वर्षीय गुकेशने नववे स्थान मिळवणे हे मोठे यश आहे. जगातील सर्वोत्तम बुद्धिबळपटूंपैकी एक होण्याच्या दिशेने त्याची वाटचाल सुरू आहे. २०२६ किंवा २०२८च्या जागतिक विजेतेपदाच्या लढतीत गुकेश खेळण्याची शक्यता नाकारता येत नाही. - प्रवीण ठिपसे, ग्रँडमास्टर बुद्धिबळपटू.

SBI Life
Apne liye. Apno ke liye.

सूचना

२३व्या वार्षिक सर्वसाधारण सभा व रिमोट ई-व्होटिंग माहितीची सूचना

ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कंपनी कायदा, २०१३ मधील लागू तरतुदी आणि त्याअंतर्गत करण्यात आलेले सर्व नियम आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने (''एमसीएची परिपत्रके'') जारी केलेली सर्वसाधारण परिपत्रक क्रमांक १४/२०२०, १७/२०२०, २०/२०२०, ०२/२०२१ आणि २/२०२२ अनुक्रमे दिनांक एप्रिल ८, २०२०, एप्रिल १३, २०२०, मे ५, २०२०, जानेवारी १३, २०२१, आणि मे ५, २०२२, आणि सेबीने जारी केलेले परिपत्रक क्रमांक : सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी१/सीआयआर/पी/२०२०/७९ दिनांक मे १२, २०२०, सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी२/सीआयआर/पी/२०२१/११ दिनांक जानेवारी १५, २०२१, आणि परिपत्रक क्रमांक : सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी२/सीआयआरपी/पी/२०२२/६२ दिनांक मे १३, २०२२ आणि सेबी (लिस्टिंगची जबाबदारी व प्रकटीकरणाची आवश्यकता) विनियम, २०१५ सुधारित (''लिस्टिंगचे नियम'') अन्वये एजीएमच्या सूचनेत नमूद करण्यात आलेले कामकाज करण्यासाठी एसबीआय लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड (''दि कंपनी'') ची २३व्या वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) मंगळवार, ऑगस्ट २९, २०२३ रोजी दुपारी ०४:०० वाजता भाप्रवेळ सदस्यांच्या सामायिक ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थितीविना व्हिडिओ-कॉन्फरान्सिंग ('VC')/अन्य ऑडिओ-विज्युअल साधनांद्वारे ('OAVM'), होईल.

२३व्या ''एजीएम''ची सूचना आणि वित्तीय वर्ष २०२२-२३चा वार्षिक अहवाल, ज्या भागधारकांनी डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स/रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट/कंपनी ह्यांच्याकडे त्यांच्या ई-मेल पत्त्यांचे नोंदणीकरण केलेले आहे, अशांनाच इलेक्ट्रॉनिकली पाठविण्यात येतील. सदरहू सूचना आणि वार्षिक अहवाल कंपनीची वेबसाइट www.sbilife.co.in, स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाइट www.nseindia.com आणि www.bseindia.com येथे तसेच KFintech ची वेबसाइट https://evoting.kfintech.com येथे देखील उपलब्ध आहेत.

वरील परिपत्रकांनुसार कंपनीने शुक्रवार, ऑगस्ट ४, २०२३ रोजी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने वार्षिक अहवालासह सूचना पाठवण्याचे काम पूर्ण केले आहे. वरील परिपत्रकांनुसार २३व्या ''एजीएम''ची सूचना आणि वार्षिक अहवाल ह्यांच्या भौतिक प्रती पाठवण्याची गरज पूर्ण करण्यात आली आहे.

सदस्यांना अशी विनंती करण्यात येते की त्यांनी त्यांचे ईमेल पत्ते आणि मोबाइल नंबर संबंधित डिपॉझिटरीज् किंवा कंपनीचे रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट्स (RTA), केफिन टेक्नालॉजीस लिमिटेड (KFintech) ह्यांच्याकडे einward.ris@kfintech.com येथे दाखल करावेत आणि त्यांचे ईमेल पत्ते नोंदवण्यासाठी कंपनीकडे त्याची एक प्रत investor@sbilife.co.in येथे पाठवावी. सदस्यांना अशी विनंती करण्यात येते की RTA आणि/कंपनी बरोबरच्या त्यांच्या सर्व पत्रव्यवहारात त्यांनी त्यांचे DP ID आणि क्लायंट ID/फोलिओ नंबर नमूद करावेत.

उपरोल्लेखित कायदा, नियम, नियमने आणि परिपत्रके ह्यांच्या अंतर्गत गरजांच्या अनुसार ''एजीएम'' मध्ये करण्यात येणाऱ्या व्यवहाराच्या गोष्टी इलेक्ट्रॉनिक माध्यमातून केल्या जातील. सदस्यांना ''एजीएम''च्या सूचनेमध्ये पुढे ठेवण्यात आलेल्या सर्व प्रस्तावांवर त्यांचे मत ''एजीएम''च्या तारखेच्या आधी रिमोट ई-व्होटिंग आणि जे त्यांचे मत आधी रिमोट ई-व्होटिंग द्वारे देऊ शकले नाहीत अशा सदस्यांना ''एजीएम'' दरम्यान ई-वोटिंग मार्गे देण्याची सुविधा पुरवण्यात आलेली आहे. कंपनीने, इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे व्होटिंगच्या सुविधेसाठी अधिकृत एजन्सी स्वरूपात केफिन टेक्नालॉजीस लिमिटेड ("KFintech") ह्यांची नियुक्ती केली आहे.

रिमोट ई-व्होटिंगचा कालावधी शुक्रवार, ऑगस्ट २५, २०२३ रोजी सकाळी ९:०० वाजता (भा.प्र.वे.) सुरू होईल आणि सोमवार, ऑगस्ट २८, २०२३ रोजी संध्याकाळी ५:०० वाजता (भा.प्र.वे.) संपेल. ह्या कालावधीमध्ये, कट-ऑफ तारखेला म्हणजेच मंगळवार, ऑगस्ट २२, २०२३ रोजी कंपनीचे सदस्य रिमोट ई-मतदानाद्वारे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करू शकतील त्याचप्रमाणे एजीएममध्ये ई-मतदान करू शकतील. वरील तारीख व वेळेनंतर ई-व्होटिंग करण्याची परवानगी दिली जाणार नाही आणि वरील कालावधी संपल्यानंतर ई-व्होटिंग सुविधा बंद करण्यात येईल. कट-ऑफ तारखेला कंपनीची सदस्य नसलेल्या व्यक्तीने ही सूचना फक्त माहितीसाठी आहे असे समजावे. एजीएमच्या ठिकाणी ई-मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल आणि ज्यांनी एजीएमच्या अगोदर ई-मतदान सुविधेद्वारे मतदान केले आहे असे सदस्य एजीएमला उपस्थित राहू शकतात परंतु ते पुन्हा त्यांचे मतदान करण्यास पात्र नसतील. एखादी व्यक्ती जर ''एजीएम''ची सूचना पाठवल्यानंतर परंतु कट-ऑफ तारखेला म्हणजेच ऑगस्ट २२, २०२३ रोजी किंवा पूर्वी कंपनीचा सदस्य झाला/झाली असेल, तर तो/ती KFintech ला ई-मेल आयडी - einward.ris@kfintech.com वर विनंती पाठवून लॉगइन आयडी आणि पासवर्ड मिळवू शकतात. तथापि तो/ती जर KFintech रिमोट व्होटिंगसाठी अगोदरच नोंदणी केलेले असतील तर तो/ती वेबकास्टचा वापर करू शकतात.

सदस्य ''एजीएम''ला उपस्थित राहू शकतात किंवा त्यांचे रिमोट ई-व्होटिंग लॉगइन अधिकार वापरून KFintech https://emeetings.kfintech.com द्वारा पुरवण्यात आलेल्या ''एजीएम''चे लाइव वेबकास्ट बघू शकतात. सदस्यांना ही वेबकास्ट सुविधा वापरण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे. त्यानंतर हे रिमोट ई-व्होटिंग मोड्यूल kfintech द्वारा डिसएबल केले जाईल. सदस्याने एकदा का प्रस्तावावर मत दिले की सदस्याला त्यानंतर ते बदलण्याची अनुमती नाही.

सर्व सदस्यांसाठी ई-व्होटिंगची पद्धत आणि कार्यवाही, ''एजीएम''साठीच्या सूचनेमध्ये योजलेल्या आहेत. ई-व्होटिंगबाबत काही चौकश्या असल्यास सदस्य Frequently Asked Questions (FAQs) आणि https://evoting.kfintech.com च्या 'download' सेक्शनमध्ये उपलब्ध असलेले ई-व्होटिंग यूजर मॅन्युअल वाचू शकतात किंवा टोल फ्री नं. १-८००-३०९-४००१ वर कॉल करू शकतात किंवा श्री. ए मोहन कुमार KFintech ह्यांना ईमेल आयडी :einward.ris@kfintech.com वर विनंती पाठवू शकतात किंवा टेलिफोन नंबर ०४०-६७१६-२२२२ वर, जे इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारा केल्या जाणाऱ्या व्होटिंगसाठीच्या सुविधेशी संबंधित असलेल्या गाऱ्हाण्याचा निवाडा करतील. आणखी पर्याय म्हणजे, सदस्य विनोद कोयंडे, कंपनी सचिव ह्यांना investor@sbilife.co.in येथे देखील लिहू शकतात.

एसबीआय लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड साठी
स्वाक्षरी/-
विनोद कोयंडे
कंपनी सचिव
(सदस्यत्व क्रमांक एसीएस ३३६१६)

दिनांक : ऑगस्ट, ०४, २०२३
ठिकाण : मुंबई

वर प्रदर्शित केलेला ट्रेड लोगो हा स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मालकीचा आहे आणि एसबीआय लाइफ द्वारा लायसन्सच्या अंतर्गत वापरला आहे. एसबीआय लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, नोंदणीकृत आणि कॉर्पोरेट कार्यालय : नटराज, एम. व्ही. रोड आणि वेस्टर्न एक्सप्रेस हायवे जंक्शन, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०६९. IRDAI रजिस्टर्ड नं. 111. CIN: L99999MH2000PLC129113. टेलिफोन नंबर : (91 22) 61910000, वेबसाईट : www.sbilife.co.in ई-मेल आयडी : investor@sbilife.co.in

हे पत्र वैदेही ठकार यांनी मालक द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) यांच्यासाठी इंडियन एक्स्प्रेस प्रेस, प्लॉट नं. ईएल-२०८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१० येथे छापून मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१ येथे प्रसिद्ध केले. **लोकसत्ता कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : २२८२२१८७.
**महापे कार्यालय :** प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **पुणे कार्यालय :** एक्स्प्रेस हाऊस, प्लॉट नं. १२०५ /२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४ . दूरध्वनी : ०२०-६७२४१०००. **नागपूर कार्यालय :** प्लॉट. नं. ३८, ऑडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७.
■ **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका** ■ **कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार** ■ **संपादक : गिरीश कुबेर** ■ **निवासी संपादक : सिद्धार्थ खांडेकर*** (* पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) R. N. I. Reg. No. 1591/57 © द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई. ■ कोलकाता, दिल्लीसाठी प्रत्येकी १० रुपये.

epaper.loksatta.com